# संत जनाबाईंचे वाङ्‌मयीन योगदान

## Literary contribution of Saint Janabai


डॉ. पवन मांडवकर

प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८



## सारांश :

महाराष्ट्रातील फार महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाचे नाव घ्यावे लागते. या पंथाने सर्व मानवांना आपल्या औदार्याने व वात्सल्याने पोटाशी धरून भक्तीच्या राजमार्गाचे हितगुज सांगितले. ज्ञानदेव-नामदेवांनी जी समानतेची शिकवण समाजात रुजविण्याचा प्रसार सुरू केला होता, तो संत स्त्रियांनी सखोलपणे आत्मसात केला होता, याचे प्रत्यंतर स्त्री-संतांच्या साहित्यातून येते. वारकरी संप्रदायात संत जनाबाईंचे नाव आदराने घेतले जाते. इ.स. सुमारे 1263 ते 1350 हा जनाबाईंचा कालखंड. जनाबाईंचे सुमारे साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत. भक्तीने ओतप्रोत भरलेले त्यांचे हे अभंग म्हणजे हृदयातील मधुर भावनेने गुंफलेली भावगीतेच आहेत. जनाबाईंची प्रत्येक क्रिया पांडुरंगमय होऊन गेलेली दिसते. नामदेवांचा संसाराचा गाडा ओढताना परमार्थाचा लाभ करून घेणाऱ्या जनाबाई आदर्श गृहिणी आणि एक स्त्री-संत म्हणून उभ्या राहतात.

The Warkari sect is one of the most important devotional sects in Maharashtra. This sect, with its generosity and love for all human beings, embraced the path of devotion. The teaching of equality which Dnyandeo-Namdeo started to inculcate in the society was thoroughly assimilated by the saintly women, the answer to which comes from the literature of women saints. In the Warkari sect, the name of Saint Janabai is revered. The period of Janabai is about 1263 to 1350. There are about three hundred and fifty abhangs of Janabai available. Filled with devotion, these abhangs are the lyric songs wrapped in the sweet feeling of the heart. Every action of Janabai seems to have turned pale. Janabai, who takes advantage of Parmartha while pulling the cart of Namdeo, stands as an ideal housewife and a woman-saint.



## बीजशब्द :

भक्तिसंप्रदाय, स्त्री-संत, पांडुरंगमय, अभंग, भावगीते, परमार्थ


## पार्श्वभूमी :

बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत म्हणजेच महानुभाव पंथ प्रवर्तित करणाऱ्या श्रीचक्रधरांपासून (शके 1107) संत बहिणाबाईंपर्यंत (शके 1557–1623) या कालखंडात महाराष्ट्रात विविध मतांची अभ्रे दाटली होती. जैन, लिंगायत, महानुभाव आणि अन्य अवैदिक पंथ आपापल्या मतांचा जोरजोराने पुरस्कार करीत होते. हेमाद्री पंडितांसारखे उच्चपदस्थ पुराणधर्माचे पुनरुज्जीवन करून कर्मकांडाचे अवडंबर माजवीत होते. बहुजन समाजात व्यभिचारी भक्तीचे हिडीस रूप थैमान घालीत होते. जाखाई, जोखाई यांसारख्या तामसी देवतांचा सुळसुळाट झाला होता. 'ज्ञानाला आचवलेला समाज ध्येयशून्य, दुबळा, संभ्रांत झाला असल्यामुळे विकृत विचारांच्या प्रसाराला अनुकूल वातावरण झाले होते. या संधीचा फायदा घेऊन परंपरेला धक्का देणारे धर्मपंथ आपले तत्त्वज्ञान बहुजन समाजाच्या गळी उतरवू पाहात होते.'[1] अशा या पार्श्वभूमीवर पुढे संत चळवळ उभी राहिली.

## वारकरी संप्रदाय :

महाराष्ट्रातील फार महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाचे नाव घ्यावे लागेल. महाराष्ट्रातील आबालवृद्धांच्या, स्त्रीपुरुषांच्या, नागरी–खेडुतांच्या सर्वत-हेच्या व्यक्तिसमूहांच्या हृदयांची पकड घेणारा असा हा पंथ आहे. इतक्या व्यापक प्रमाणात जनमानसाची पकड घेण्यामागे या पंथाने सर्व

मानवांना आपल्या औदार्याने व वात्सल्याने पोटाशी धरून भक्तीच्या राजमार्गाचे हितगुज सर्वांना मोकळेपणाने सांगितले, हेच कारण आहे, असे म्हटले तरी चालेल. 'वारकरी संप्रदायाच्या सामाजिक आणि धार्मिक कामगिरीचा एक परिणाम म्हणून स्त्रियाही भक्तिमार्गाच्या वाटचालीत पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या,'[2] हेदेखील वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. कर्मयोगाचे पालन करीत उत्कट भक्तीचा आविष्कार त्यांच्या अभंगरचनांतून जाणवतो.

## महाराष्ट्रातील स्त्रीसंतसाहित्य :

महाराष्ट्रातील स्त्रीसंतांच्या साहित्याचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की, या साहित्यिका संख्येने पन्नास–पंचावन्न भरतील. त्यात समाजातील उच्चनीच सर्व थरांतील महिलांचा समावेश आहे. उदा. मराठीतील आद्य कवयित्री म्हणून संबोधल्या जाणारी महदंबा, ज्ञानदेवादी आत्मसाक्षात्कारी संतांची धाकटी बहीण मुक्ताबाई व तुकारामशिष्या बहिणाबाई यांसारख्या काही संत स्त्रिया उच्चस्तरीय समाजातून परमात्म्याच्या भक्तीकडे वळल्या आहेत. नामयाची दासी जनी, चोखामेळ्याच्या कुटुंबातील त्याची पत्नी सोयराबाई व बहीण निर्मळा या समाजातील तळागाळातल्या असूनही उच्चकोटीची आध्यात्मिक उन्नती साधलेल्या या स्त्रिया, कान्होपात्रेसारखी स्त्री त्यात समाजाच्या दृष्टीने तिरस्करणीय अशा व्यवसायातून आलेली, अशा विविध सामाजिक उच्चनीचतेमुळे व त्यांच्या संप्रदायाच्या प्रभावामुळे त्यांच्या देवावर विसंबण्याच्या वृत्तीतही वेगळेपणा दिसतो.

ज्ञानदेव–नामदेवांनी जी समानतेची शिकवण समाजात रुजविण्याचा प्रसार सुरू केला होता, तो या संत स्त्रियांनी किती सखोलपणे आत्मसात केला आहे, याचे प्रत्यंतर या स्त्रीसंतांच्या साहित्यातून येते. तसेच आपण जगात एकटे नाही, देव सदैव आपला पाठीराखा आहे, अशा श्रद्धेमुळे त्यांच्या भावना प्रकटीकरणातील प्रामाणिकपणा मन मोहविणारा आहे. कोणत्याही बंडखोरीची सुरुवात आधी शब्दांनी होते आणि नंतर ती कृतीतून साकार होते. या दृष्टीने आपल्या जीवनातील व्यथा व आपल्यावरचे अन्याय या स्त्रिया शब्दांतून मांडू लागल्या, हा या काळचा महत्त्वाचा विशेष आहे.

## संत जनाबाई :

वारकरी संप्रदायात संत जनाबाईंचे नाव आदराने घेतले जाते. संत जनाबाई यांचा जन्म परभणी जिल्ह्यातील गंगाखेड गावातील दमा आणि करुंड ह्या दाम्पत्याच्या पोटी झाला. पांडुरंगाच्या नवसाने त्यांना ही अपत्यप्राप्ती झाली होती. इ.स. सुमारे 1263 ते 1350 हा जनाबाईंचा कालखंड. जनाबाईंच्या चरित्राविषयी विशेष माहिती मिळत नसली, तरी महिपतीबोवा ताराबादकर ह्यांच्या 'नामदेव चरित्रा'तून जनाबाईंविषयीचे काही संदर्भ मिळतात. जनाबाईंच्या जन्मानंतर पाच–सहा वर्षांनी करुंडचे निधन झाले. जनाबाईचा पिता दमा ह्याच्या स्वप्नात दृष्टांत झाला. त्यात सांगितल्याप्रमाणे त्याने आपल्या लेकीला दामाशेट्टींच्या स्वाधीन केली. दामाशेट्टींच्या भरल्या घरातली एक होऊन आपली मुलगी राहील, असा विचार त्यांनी केला. दामाशेट्टींच्या घरातील सर्व सदस्य विठ्ठलभक्तीतच तद्रूप झाले होते. साहजिकच ह्या गोष्टींचा प्रभाव लहानपणापासून जनाबाईंवर पडला. जनाबाईंच्या विवाहासंबंधी कुठेही माहिती उपलब्ध नसली तरी सर्व प्रापंचिक नात्यांची ओळख जनाबाईंना नामदेवांच्या कुटुंबातच झाली.

## संत जनाबाईंचे वाङ्मयीन योगदान :

जनाबाईंचे सुमारे साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत. भक्तीने ओतप्रोत भरलेले त्यांचे हे अभंग म्हणजे हृदयातील मधुर भावनेने गुंफलेली भावगीतेच आहेत. अतिशय तळमळीने विठ्ठलाला साद घालून, आर्तपणे त्याच्या दर्शनासाठी आसुसलेल्या जनाबाई आपल्या अभंगांतून आपल्या मनातील तरंगच ऐकवणाऱ्यापर्यंत पोचवितात.

'जनाबाईंच्या अभंगात सहजसुलभ गेयता, शब्दयोजनेतील ताल व तोल, मांडणीमधील रेखीवपणा हे बाह्य गुण तर आहेतच; परंतु त्याबरोबर अनुभूतीतील अभिजात भावोत्कटता तसेच काव्यशैलीतील रसाळपणा ह्या गुणसमुच्चयाने जनाबाईंचे अभंग अत्यंत लोकप्रिय झाले आहेत.'[3] जनाबाईंचे काव्य महाराष्ट्रीय स्त्रीला आपलेसे वाटते; कारण त्यात तत्कालीन स्त्रीजीवनाचे प्रातिनिधिक स्वरूप प्रकट झाले आहे. सामाजिक बंधनात अडकलेल्या सहनशील आणि शालीन स्त्रीचे हृदय त्यांच्या अभंगात दर्शित होते. जनाबाईंनी आपल्या अभंगातून भक्तिमहात्म्य सांगितले आहे. त्यांच्या मते भक्तीच्या माध्यमातून परमार्थाची

प्राप्ती आपल्याला होऊ शकते. ईश्वराच्या अस्तित्वाला आपल्या जीवनातच सामावून घेणाऱ्या जनाबाई एक विलक्षण स्त्री आहेत. *'जनी दृष्टी पाहे । जिकडेतिकडे हरी आहे ।।'* दळणकांडण आदी घरगुती कामे करतानासुद्धा विठ्ठल आपल्यासोबत आहे, असे त्यांना वाटते. विठ्ठलमय झालेल्या जनाबाई स्वतः व ईश्वरातील सर्व द्वैत नाहीसे करताना म्हणतात, *'देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ।। देव देते देव घेते । देवासवे व्यवहारिते ।।' तसेच 'झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।।'* ('नामदेवगाथा', अभंग क्र. 219) ह्यांसारखे उल्लेख त्यांच्या ईश्वराप्रतीच्या एकरूपतेची ओळख करून देतात. असे घडणे चमत्कार वाटत असले तरी जनाबाईंच्या भावविश्वाचा तो एक भाग होता.

तत्कालीन सांप्रदायिक परंपरेनुसार उपदेशपर अभंगही जनाबाईंनी लिहिले आहेत. परधन, कामिनी यांची वासना मनाला नसावी, अधमतृष्णा मनाला लागू नये, निरपेक्ष वासना मिळावी, देवाची सेवा घडावी असे जनाबाईंचे मागणे आहे. वैष्णवाची व्याख्या करताना त्या म्हणतात, कोणत्याही कुळातला, जातीतला असला तरी शांतीची भूषणे मिरविणारा हा खरा वैष्णव होय. अशांना त्या वंदन करतात. संत हे देवाचे डोळे असतात, असे त्यांचे म्हणणे आहे. संतांच्याच डोळ्यांनी देव आपल्याकडे पाहतात. त्यांच्याच कानांनी आपले चिंतन ऐकतात. म्हणून संत हेच देवाचे वंदन मानून जनाबाई त्यांना जिवेभावे ओवाळतात.

'सत्त्वगुणांशिवाय प्रतिष्ठा मिळवू पाहणाऱ्या 'लटिकेच नेत्र लावून ध्यान करणाऱ्या' दांभिकांवर जनाबाईंनी टीका केली असली, तरी तुकोबांच्या पद्धतीने परखड टीका करणे ही जनाबाईंची प्रकृती नाही. 'झालेपणाचे गुण, दिसतांती सगुण' एवढेच बोलून जनाबाई थांबतात. क्वचित *'वैष्णव तो एक इतर ती सोंगे । ठसे देऊनी अंगे चितारिती ।।'* ह्यांसारख्या अभंगांचा अपवाद दिसून येतो.'[4]

जनाबाईंनी कृष्णजन्म, बालक्रीडा यांचे वर्णन करणारे अभंग लिहिले आहेत; पण त्यांची संख्या फार थोडी आहे. ज्ञानदेवांच्या स्तुतीपर अभंगात त्या म्हणतात, *'ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।। मरोनिया जावे । बा तुझ्या पोटी यावे ।।'*

जनाबाईंनी सेना न्हावी व नामदेव ह्यांचे चरित्रपर अभंग लिहिले आहेत. ह्याशिवाय 'हरिश्चंद्राख्यान' लिहिले असून तारामती, रोहिदास आणि हरिश्चंद्र ह्यांच्या कसोटीपर प्रसंगांतून भक्ताचे आदर्श उभे केले आहेत. 'थालीपाक', 'तीर्थावळी', 'पाळणा', 'दशावतार वर्णन' ह्या त्यांच्या आणखी काही रचना.

जनाबाईंची अभंगसृष्टी भक्तीच्या वाटेवरची असली तरी आध्यात्मिक संकल्पनांशी असलेला त्यांचा परिचय त्यांच्यातल्या चौफेर जाणिवांचे प्रतीक म्हणता येईल. अविद्या, माया, ब्रम्ह, आत्मा, परमात्मा इत्यादींची जाण त्यांना होती. 'वारकरी संप्रदायात बंड करून वारकऱ्यांशी स्त्रियांची नाळ जोडण्याचे कार्य संत जनाबाईंनी केले. आपल्या अभंगांतून 'स्त्रीचे घर हेच विश्व' ह्या संकल्पनेला तडा दिला.'[5]

वास्तविक पाहता जनाबाई अशिक्षित; परंतु *'बाई मी लिहिणे शिकले सद्गुरुरायापाशी ।'* असे त्या सांगतात. भक्ताने ईश्वरप्राप्तीसाठी काकुळतीला येणे आपण समजू शकतो; पण येथे जनाबाईंनी विठ्ठलालाच काकुळतीला आणले आहे. *'सोहम शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळती आला ।।'* असे त्या म्हणतात.

'विठोबा आणि पांडुरंग आणि पंढरपूर ह्यांविषयी सर्व संतांनी अभंग लिहिले; पण जनाबाईंच्या अभंगांचे काव्यरूप अत्यंत वेगळे आहे. त्यात वत्सलतेचा व मातृत्वाचा म्हणजेच स्त्रीत्वाचा स्पर्श आहे. त्यामुळेच एकप्रकारचा लडिवाळ लोभसपणा त्यात दिसून येतो. *'विठू माझा लेकुरवाळा । सख्या पंढरीचा राया ।। पाय जोडुनी विटेवरी । ये ग ये ग विठाबाई ।।'* किंवा *'धरिला पंढरीचा चोर'* यांसारखे अभंग त्याचे द्योतक आहेत.'[6]

वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला एक महान देणगी दिली, ती म्हणजे माणसामाणसांतील उच्चनीचतेच्या भावनेचे उच्चाटन. समाजातील सर्व थरातल्या लोकांना स्त्रीपुरुष, सामान्य असामान्य या सर्वांना परमेश्वरप्राप्तीचा अधिकार आहे, असा विचार त्यांनी समाजाला दिला. या देणगीचा फायदा जनाबाईंना भरपूर प्रमाणात मिळाला. त्यांचे आयुष्य काबाडकष्टांत गेले. सुखाचे कोणतेही वारे त्यांना लाभले नाही. तरी आपल्या परमभक्तीने परमेश्वराची अत्यंत आवडती स्त्री म्हणून त्या सर्वांच्या स्मरणात राहिल्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून व अभंगरूपाने विविध विषय प्रसृत करण्यातून साकार होणारे बहुश्रुतत्व आणि माधुर्य यांमुळे सर्व संत कवयित्रींमध्ये त्यांचे काव्य मनाला विशेष मोहून घेते. 'कविता म्हणून, काव्यमूल्य म्हणून, भावोत्कटता म्हणून किंवा सुखदुःखानुभवातील परिवर्तने लक्षात घेतली, कवितेतील त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विकास लक्षात घेतला, तर जनाबाईंइतकी श्रेष्ठ कवयित्री दुसरी कोणी नाही.'[7]

'संत जनाबाईंचे आणखी एक विशेष म्हणजे कर्मयोगाचे पालन करीत उत्कट भक्तीचा आविष्कार त्यांच्या अभंगरचनांतून होतो. इतकेच नव्हे तर त्यांनी योगमार्गाचाही अनुभव घेतल्याचे त्यांच्या अभंगांवरून दिसते.'[8] जनाबाईंची प्रत्येक क्रिया पांडुरंगमय होऊन गेलेली दिसते. दळण, कांडण करताना, झाडलोट करताना त्यांना सर्वत्र पांडुरंगच दिसतो. अशी नामदेवांचा संसाराचा गाडा ओढताना परमार्थाचा लाभ करून घेणाऱ्या जनाबाई आदर्श म्हणून उभ्या राहतात. गृहिणी आणि एक स्त्री संत म्हणून त्यांची भूमिका कुठेही कमी पडत नाही. त्यांनी दिलेले साहित्य योगदान मराठी वाङ्मयीन इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

❖ ❖ ❖

संदर्भ :


1. भिंगारकर, दा.बा., 'पार्श्वभूमी', **संत कवयित्री जनाबाई : चरित्र, काव्य आणि कामगिरी**, प्रथमावृत्ती, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, 1989, पृ. 3–4.
2. इनामदार, हे.वि., खोले, विलास (संपा.), 'अनंत लावण्याची शोभा', **भक्तिगंगेच्या वाटेवर**, प्रथमावृत्ती, संजय प्रकाशन, पुणे, 1988, पृ. 3.
3. भिंगारकर, दा.बा., 'संत जनाबाईची कामगिरी', **संत कवयित्री जनाबाई : चरित्र, काव्य आणि कामगिरी, उ.नि.**, पृ. 280.
4. इनामदार, हेमंत, नसिराबादकर, ल.रा. (संपा.), प्रस्तावना : 'चंद्रभागेतीरी', **महाद्वाराच्या पायरीशी**, प्रथमावृत्ती, हेमंत प्रकाशन, कोल्हापूर, 1990, पृ. 28.
5. श्यामसुंदर, श्रीकृष्ण, 'नामयाची दासी : संत जनाबाई', आत्मोन्नती पुरवणी, **दै. देशोन्नती**, अकोला, दि. 17–3–2005, पृ. 3.
6. कुलकर्णी, आरती, 'नामयाची जनी झाली कैवल्याची धनी', **मुक्त आनंदघन**, **उनि.**, पृ. 31.
7. पाठक, यशवंत, 'श्रेष्ठ कवयित्री', **मुक्त आनंदघन**, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. 32.
8. देवकर, वर्षा, 'स्त्रीसंतांची पारमार्थिक वाटचाल', **ज्ञानेश्वर त्रैमासिक**, संपा. प्र.द. पुराणिक, पुणे, वर्ष 37, अंक 1 (फेब्रुवारी 2005, स्त्रीसंत विशेषांक), पृ. 68.


❖ ❖ ❖